# नियमित दिवाणी दावा क्र. १५२/२०२१ मधील नि. २५ वरील आदेश.

(**CNR–MHAH** २३–०००३७३–२०२१)

१. अर्ज व म्हणणे पाहिले. उभय पक्षांचे सुविदय वकीलांचा युक्तीवाद ऐकला.

२. प्रतिवादी क्र. १ ते ७ यांनी अर्जात कथन केले आहे की, कैफियत देण्यासाठी आवश्यक ती जुनी महसूली कागदपत्रे व नकला उपलब्ध होण्यास बराच कालावधी लागला त्यामुळे ते मुदतीत कैफीयत दाखल करु शकले नाहीत. त्यांनी कैफियत देण्यास जाणीवपुर्वक विलंब केला नसुन झालेला विलंब रास्त कारणास्तव झाला आहे, त्यामुळे न्यायाचे दृष्टीने विलंब माफ करुन त्यांची कैफीयत स्वीकारण्यात यावी, असे त्यांचे कथन आहे.

३. वादींनी त्याच अर्जावर म्हणणे देवून अर्जास विरोध केला. वादीचे कथनानुसार, अर्ज खरा व बरोबर नाही. प्रतिवादी यांनी कैफियत देण्यास जाणीवपूर्वक विलंब केला आहे. प्रतिवादींनी दिनांक १२.११.२०२१ रोजी हजर झाल्यावर एकदाच कैफियत मुदतीचा अर्ज दिला आहे. त्यामुळे नव्वद दिवसांचे कालावधीत कैफियत देण्याचा हक्क राहीलेला नाही. विलंबाचे कारण अर्जात नमुद नाही. त्यामुळे अर्ज नामंजूर करण्यात यावा व अर्ज मंजूर केल्यास रु. १०,०००/– खर्च बसविण्यात यावा, असे वादीचे कथन आहे.

४. अभिलेखाचे अवलोकन करता, प्रतिवादी क्र. १ व ४ ते ७ यांना दिनांक ०८/११/२०२१ व ११/११/२०२१ रोजी समन्सची बजावणी झाली असून प्रतिवादी क्र. १ व ४ ते ७ हे दिनांक १२/११/२०२१ रोजी व प्रतिवादी क्र. २, ३ हे दिनांक १८/०७/२०२२ रोजी प्रकरणात हजर झाले आहेत. त्यांनी समन्स बजावणी पासुन अगर हजर झालेपासून कमीत कमी ३० व जास्तीत जास्त ९० दिवसांत कैफियत देणे आवश्यक

होते. परंतु त्यांनी विहित मुदतीत कैफीयत न दिल्याने प्रतिवादी क्र. १, ४ ते ७ यांचे विरुध्द दिनांक २३/०६/२०२२ रोजी विना कैफीयत आदेश झाला आहे. प्रस्तुत अर्ज दिनांक १८/०७/२०२२ रोजी दिला आहे. यावरुन प्रतिवादी क्र. १, ४ ते ७ यांना कैफीयत दाखल करण्यास सुमारे ७ महिने १० दिवस विलंब झाला आहे. प्रस्तुत दावा मयत प्रतिवादी नं. ८ व ९ यांचे वारस अभिलेखावर घेणेकामी तजवीज बोर्डावर प्रलंबित आहेत. त्यामुळे अर्ज मंजुर झाल्यास दाव्याच्या स्थितीवर विशेष विपरीत परीणाम होणार नाही. प्रतिवादी यांना कैफीयत देण्यास संधी न दिल्यास मुळ वादमुद्दा गुणदोषावर निर्णित न होता नवीन प्रकरण दाखल होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे कैफीयत अभिलेखावर आल्यास उभय पक्षकारांचा पुरावा होवून वादातील मुदयांचे एकाचवेळी गुणदोषावर निरसन होईल. प्रस्तुत प्रकरण सन २०२१ मध्ये दाखल झाले असून वाटपासाठी दाखल केले आहे. या सर्व बाबींचा विचार करता, अर्ज मंजूर करणे संयुक्तिक ठरणार आहे. करीता, पुढीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

## आ दे श

१. नि. १४ येथील अर्ज, प्रतिवादी क्र. १ व ४ ते ७ यांनी वादी यांना पुढील तारखेस अगर तत्पुर्वी रक्कम रु. ५००/– खर्च देण्याचे अटीवर मंजूर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादी यांनी वरीलप्रमाणे पुर्तता केल्यावर त्यांनी दाखल केलेली कैफीयत वाचुन नोंदविण्यात येईल.

श्रीगोंदा.
दिनांक ०५/०८/२०२३.

**( जी. एम. साधले )**
सहदिवाणी न्यायाधीश, व. स्तर,
श्रीगोंदा, जि. अहमदनगर.